# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८

दूरध्वनी -२३०२३९००/ २३०७५५३९ Website : www.msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२

## प्रसिध्दी पत्रक क्र. १७

### - गोव्यासाठी एस. टी. ची निम - आराम सेवा -

**मुंबई, बुधवार, दि. ३१ मार्च, २०१०**

उन्हाळी हंगामात गोव्याला जाणारी प्रवाशांची गर्दी विचारात घेऊन रा. प. महामंडळातर्फे शुक्रवार, दि. ९ एप्रिल, २०१० पासून मुंबई ते पणजी दरम्यान २ X २ बैठक व्यवस्था असलेली नविन आरामदायी निम - आराम सेवा सुरु करण्यांत येणार आहे. रात्रीचे भोजन उरकल्यानंतर प्रवाशांना प्रवास सुरु करता यावा या हेतूने सदर बस मुंबई सेंट्रलहून रात्रौ ९.०० वा. सुटणार आहे. ही बस पनवेल - महाड - चिपळूण - लांजा - कणकवली - सावंतवाडी मार्गे पणजीत दुस-या दिवशी सकाळी ९.०० वा पोहोचणार असून परतीच्या प्रवासासाठी पणजीहून सायंकाळी ७.०० वा. सुटलेली बस मुंबई सेंट्रल येथे दुस-या दिवशी सकाळी ७.०५ वा पोहोचेल. मुंबई सेंट्रल ते पणजी प्रवासभाडे प्रौढांसाठी रु.५३४/- आकारण्यांत येणार आहे. या निम आराम सेवेमुळे पर्यटनानिमित्त मुंबई ते गोवा दरम्यान प्रवास करणा-या प्रवाशांचा विशेष लाभ होणार आहे.

या बसचे संगणकीय आरक्षण उपलब्ध करण्यांत येत असून प्रवाशांनी या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**

MAHARASHTRA STATE ROAD TRANSPORT CORPORATION
Central Office, Maharashtra Vahatuk Bhavan, Dr Anandrao Nair Marg
Mumbai Central, Mumbai 400 008
Tel : 23075539/23023900 E-mail : pro@msrtc.gov.in Fax : 23086352

## PRESS NOTE No 17

## MSRTC to start new semi luxury on Mumbai-Panjim route

Mumbai, Wednesday, March 31, 2010

Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) will be introducing new semi-luxury service on Mumbai – Panjim route. The bus will start plying to-and-fro from Friday, April 9. The bus will leave Mumbai Central at 21.00 hrs and cover the distance of 574 kms via Panvel-Mahad-Chiplun-Kankavli-Sawantwadi to reach Panjim next day at 9.00 hrs. The bus for its return journey will start from Panjim at 19.00 hrs & reach Mumbai Central next day at 7.05 hrs via same route. The fare for adult will be Rs 534/-.

With this semi-luxury service, the long standing demand of the passengers of Mumbai & Panjim has been fulfilled. MSRTC urges citizens of both cities to utilize & take benefit of this service.

**Asst Public Relations Officer**